# मुंबई विद्यापीठ

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
छत्रपती शिवाजी महाराज भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई— ४०० ०९८.

ईमेल cap.exam@mu.ac.in


क्र. परीक्षा/कें.मु.कें./२५९९३/२०२६

**विषय:— उत्तरपुस्तिका मुल्यांकनासाठी मार्गदर्शक सूचना (Assessment Guidelines)**

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय/अशासकीय, अनुदानीत/विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, समाजशास्त्र, गृहविज्ञान व नृत्य, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन, स्थापत्यशास्त्र आणि हॉटेल मॅनेजमेंट महविद्यालयांचे प्राचार्य, मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे विभाग प्रमुख/संस्थेचे संचालक, दूरस्थ ऑनलाईन शिक्षण संस्थेचे संचालक, (CDOE) प्राचार्य सर ज.जी, वास्तुशास्त्र महाविद्यालय, विद्यापीठाच्या रत्नागिरी, सिंधुदुर्ग व ठाणे उपपरिसरांचे संचालक/समन्वयक, विश्वभुषण डॉ. बाबासाहेब आबेंडकर महाविद्यालय, अंबाडवे, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ८९ आणि ४८ (४) नुसार परीक्षांचे निकाल विहित मुदतीत घोषित करण्यासाठी काही महत्वाच्या बाबींचा पुर्नविचार होणे गरजेचे असल्यामुळे उत्तरपुस्तिकांच्या मुल्यांकनासाठी खालील काही महत्वाच्या सूचना विद्यापीठमार्फत निर्गमित करण्यात येत असून सर्व महाविद्यालयांनी, शैक्षणिक संस्थांनी आणि शिक्षकांनी त्याचे पालन करणे आवश्यक आहे.

१. विद्यापीठामार्फत नियुक्त करण्यात आलेले प्राश्निक (Paper Setter) यांनी प्रत्येक प्रश्नपत्रिकेसोबत नमुना उत्तरपत्रिका (Model Answer key) विद्यापीठाकडे सादर करावी.

२. किमान दोन (०२) वर्ष शिकविण्याचा अनुभव असलेल्याच शिक्षकांची मुल्यांकनासाठी नोंदणी करण्याची जबाबदारी हि महाविद्यालयाच्या प्राचार्यांची असेल. मुल्यांकनासाठी संबंधित विषयाच्याच शिक्षकाची नोंदणी होईल याची काळजी घ्यावी.

३. विद्यापीठ परिपत्रक क्र. १६४८—अ/दि. २७ मार्च २०१८ नुसार प्रत्येक महाविद्यालयाने संगणक आधारीत मुल्यांकन (OSM) सुरू करणे बंधनकारक असून विद्यापीठाशी संलग्नित असलेले प्रत्येक महाविद्यालय हे ऑनलाईन (Online) मुल्यांकनासाठी मुल्यांकन केंद्र (CAP Centre) असेल.

४. महाविद्यालयातील मुल्यांकन केंद्र (CAP Centre) हे CCTV च्या निगराणीखाली असावे. CCTV Footage मागितल्यास उपलब्ध करून देणे बंधनकारक असेल.

५. **दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उत्तरपुस्तिकेच्या आतील ३,५,७,९, १० आणि १५ व्या पानावर LD (Learning Disability) असा शिक्का मुद्रित करणे बंधनकारक असून उपस्थिती तक्ता** (Attendance Sheet) वर सुध्दा L.D. चा उल्लेख करावा.

....२/—

ईमेल cap.exam@mu.ac.in

# मुंबई विद्यापीठ

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
छत्रपती शिवाजी महाराज भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई– ४०० ०९८.



६. परीक्षेशी संबधित अध्यादेश (Ordinance relating to examination) O.5050 अन्वये अवैध साधन सामुग्री (unfairmeans) प्रकरणांच्या उत्तरपुस्तिका ह्या ज्युनिअर सुपरवायझर व सिनियर सुपरवायझर यांनी स्पष्ट मत मांडून विद्यापीठात पाठवताना स्वतंत्र पाकिटात पाठविणे. उपस्थिती तक्ता (Attendance Sheet) वेगळा पाठवावा.) तसेच विद्यार्थ्याकडे भ्रमणध्वनी देखील आढळल्यास तसा पत्रात उल्लेख करून भ्रमणध्वनी विद्यापीठाकडे जमा करावा.

७. संगणक आधारित मुल्यांकनादरम्यान (OSM) प्रत्येक परीक्षकाने उत्तरपुस्तिका शेवटच्या पानापर्यत पूर्णपणे तपासणे आणि प्रत्येक प्रश्नाचे मुल्यांकन करणे बंधनकारक आहे.

८. संगणक आधारित मुल्यांकनादरम्यान (OSM) मुल्यांकन न केलेला भाग (Unassess Part) आढळल्यास ती उत्तरपुस्तिका विद्यापीठामध्ये येऊन पुन्हा तपासण्याची जबाबदारी संबंधित शिक्षकांची असेल.

९. संगणक आधारित मुल्यांकन (OSM) करताना प्रत्येक प्रश्नाचे गुण उत्तर पूर्ण झाले आहे त्याच पानावर देण्यात यावे. विद्यार्थ्यांने लिहिलेल्या प्रत्येक प्रश्नास गुण देणे बंधनकारक आहे. (विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की, विद्यार्थ्यांने प्रश्नाचे उत्तर लिहिले असताना देखील गुणदर्शिकेमध्ये NA असा उल्लेख केलेला असतो असे होणार नाही याची प्रत्येक शिक्षकाने काळजी घ्यावी.)

ykraundale

डॉ. पुजा रौंदाळे
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

दि. २६ फेब्रुवारी, २०२६
मुंबई –४०० ०९८.

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय/अशासकीय, अनुदानीत /विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, समाजशास्त्र, गृहविज्ञान व नृत्य, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन, स्थापत्यशास्त्र आणि हॉटेल मॅनेजमेंट महविद्यालयांचे प्राचार्य, मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे विभाग प्रमुख/संस्थेचे संचालक, दूरस्थ ऑनलाईन शिक्षण संस्थेचे संचालक, (CDOE) प्राचार्य सर ज.जी दृ वास्तुशास्त्र महाविद्यालय, विद्यापीठाच्या रत्नागिरी, सिंधुदुर्ग व ठाणे उपपरिसरांचे संचालक/समन्वयक, विश्वभुषण डॉ. बाबासाहेब आबेंडकर महाविद्यालय, अंबाडवे, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र

प्रत माहितीकरिता अग्रेषित:–

स्विय सहायक, मा.सचांलक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, विद्यानगरी, मुंबई –४०० ०९८.